BHARATI VIDYAPEETH'S
COLLEGE OF ENGINEERING, KOLHAPUR
Accredited by NAAC With 'A' Grade
Approved by AICTE, New Delhi & Affiliated to Shivaji University, Kolhapur
Near Chitranagari, Kolhapur - 416013 (MS)
DTE INSTITUTE CODE : EN-6288
Tel.No.: (0231) 2638893, 2638894, Fax : 2636050
Web : http://coekolhapur.bharatividyapeeth.edu E- mail : coekolhapur@bharatividyapeeth.edu

FOUNDER CHANCELLOR
Dr. Patangrao Kadam
M.A., LL. B., Ph. D.

PRINCIPAL
Dr. Vijay Ghorpade
M.E., Ph. D. (Computer)

# NAAC SSR CYCLE- 2



| Criterion 4 | Infrastructure and Learning Resources |
|---|---|
| Key Indicator 4.1 | Physical Facilities |

**4.1.1 The institution has adequate infrastructure and other facilities for,**

- **Teaching learning, viz. , classrooms , laboratories, computing equipment etc.**
- **ICT – enabled facilities such as smart class, LMS etc.**
  **Facilities for cultural sports activities, yoga center, games (indoor and outdoor), gymnasium auditorium, etc.**

## Infrastructure for Cultural Activities



| Sr. No. | Particular | Area in Sq.M | Location |
|---|---|---|---|
| 1 | Auditorium | 285 | Central Building GF011 |




**Cultural Team Won Purshottam Karandak**



**Cultural Team selected for Ahmednagar mahakarandak from Kolhapur zone**





Students Performing Loknritya Dangi




Students Performing Street Play :Sugaymya Bharatbhiyan




**Performing Classical Instrument Play**




**Performing Mime Act At Central Youth**




फ. ए. सोसायटीचे
मुधोजी महाविद्यालय
फलटण


कै.जयंत करंदीकर
सभागृह


मुधोजी महाविद्यालय, फलटण.

11/03/2022

# के.वाय.के.एम महाराष्ट्र शब्दरंग करंडक राज्यस्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धा धुळ्यात संपन्न

## महाराष्ट्र शब्दरंग करंडक वक्तृत्व स्पर्धेचा विजेता प्रफुल्ल माळी, कोल्हापूरचा संकेत पाटील द्वितीय, तर दर्शना राजपूत तृतीय

**धुळे** - तळागाळातील युवकांचा भाषण कौशल्याने विकास व्हावा आणि भावी पिढीला वक्तृत्वाचा छंद लागावा या उद्देशाने के.वाय.के.एम फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित "महाराष्ट्र शब्दरंग करंडक-२०२२" वक्तृत्व स्पर्धेचे दुसरे पर्व धुळ्यात पार पडले. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यातील युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.




स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रदीपजी पवार यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी त्यांनी स्पर्धा परीक्षेत वक्तृत्वाचे महत्व अधोरेखित केले तर स्वच्छता आणि वक्तृत्व याबाबत मार्गदर्शन केले, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्रजी सोनवणे यांनी वक्तृत्वाचे प्राचीन काळापासून असलेले नाते आणि आजची परिस्थिती यावर मत व्यक्त केले, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष समाजसेवक श्री.अमोल (बंटी) मासुळे यांनी एका वक्त्याने भविष्यातील इतर पाच वक्ते घडवावे असे प्रतिपादन केले. स्पर्धेच्या मध्यांतरांतर भोजनाची व्यवस्था संस्थेतर्फे करण्यात आली होती, बक्षीस समारंभ कार्यक्रमासाठी नेहरू युवा केंद्राचे युवा अधिकारी श्री.अशोककुमार मेघवाल उपस्थित होते, यावेळी एका भाषणाने युद्ध होऊ शकते, तर एका भाषणाने युद्ध थांबू देखील शकते असे मत त्यांनी मांडले. परीक्षक म्हणून एस.जी.एम.सी.टी संस्थेचे अध्यक्ष श्री.योगेश्वर आव्हाळे यांनी पारदर्शक पद्धतीने गुणदान करून योग्य निकाल दिला, तर वक्त्यांच्या त्रुटी दूर करण्यासाठी ज्ञानेश्वरी वाचनाचा सल्ला देखील सांगितला. के.वाय.के.एम फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री.मोहनिश वाडेकर यांनी स्वानुभव सांगून हरलेल्या वक्त्याने इतरांना वक्ता बनविण्यासाठी प्रयत्न करावे असे मत व्यक्त केले.

स्पर्धेत प्रथम क्रमांक प्रफुल्ल माळी, द्वितीय संकेत पाटील, तृतीय दर्शना राजपूत, उत्तेजनार्थ प्रसाद जगताप आणि निर्मिती वैद्य, श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा वक्ता रोहीत ठाकूर, तर शब्दरंग विशेष हर्षदा पाटील यांनी पारितोषिके पटकविले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी आयोजन अध्यक्ष कल्पेश बोरसे, खजिनदार चेतन उपाध्याय, संचालक सदस्य निलेश तेलंग, सूत्रसंचालन प्रसाद महाले, स्नेहा बडगुजर, दिव्या सावळे, ज्ञानेश्वरी बिडवे, हर्षदा बडगुजर, भाग्यश्री भावसार, प्रियंका विसपुते, मानसी शिसोदे, अश्वघोष पवार, प्राजक्ता अहिरराव, मुकेश फलके, जागृती मोगरे यांनी मेहनत घेतली.

---

Mar 2022 Page 2

रगाणा सकाळ » TODAY नाशिक, गुरुवार, ३ मार्च २०२२ २

# ओझरच्या रसिक हांडोरेला विजेतेपद

## पेठ येथे दादासाहेब बिडकर स्मृती वक्तृत्व स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

पेठ, ता. २ : डांग सेवा मंडळ संचालित येथील दादासाहेब बिडकर महाविद्यालयात तेराव्या राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन दादासाहेब बिडकर स्मृती करंडक वक्तृत्व स्पर्धा झाल्या. या ओझर महाविद्यालयातील रसिक हांडोरे याला विजेतपद मिळाले आहे.

अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा हेमलता बिडकर तर प्रमुख पाहुणे डॉ. प्रभाकर पवार, प्राचार्य डॉ. रघुनाथ टोचे होते. स्पर्धा संयोजक डॉ. नरेंद्र पाटील यांनी स्पर्धेचे महत्व सांगत पाहुण्यांचा परिचय करून दिला. विद्यापीठ घेत असलेल्या उपक्रमातून समाजातून सूज्ञ व सुजान नागरिक घडावेत यासाठी आजच्या तरुण पिढीने चांगले वाचन, लेखन केले तर निश्चित त्यांची अभिवृत्ती अभिव्यक्ती समृद्ध होते. या स्पर्धांमधून तयार होणारे वक्ते हेच राष्ट्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घटक आहेत हे विचारात घेतले पाहिजे असे श्रीमती बिडकर यांनी सांगितले. स्पर्धेत विद्यापिठ संलग्न असलेल्या मुंबई, पुणे, कल्याण, कोल्हापूर, धुळे, नगर आदी महाविद्यालयांतून सुमारे २२ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

वक्तृत्व स्पर्धा विजेते असे : प्रथम : रसिक चंद्रभान हंडोरे (ओझर महाविद्यालय, नाशिक, ५५५५ रूपये रोख, करंडक व प्रशस्तिपत्र), द्वितिय : वृषभ सुशील चौधरी (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, ३३३३ रूपये रोख, करंडक व प्रशस्तिपत्र), तृतीय : संकेत कृष्णात पाटील (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, कोल्हापूर,२२२२ रूपये रोख, करंडक व प्रशस्तिपत्र). उत्तेजनार्थ : यश रवींद्र पाटील (बी. के. बिर्ला महाविद्यालय, कल्याण, प्रथम ११११ रूपये रोख, करंडक व प्रशस्तिपत्र). उतेजनार्थ : देविदास तुळशिराम गावित (दादासाहेब बिडकर महाविद्यालय, पेठ, ५५५ रूपये रोख, करंडक व प्रशस्तिपत्र), श्रुती अशोक बोरसे (एचपीटी व आरवायके महाविद्यालय, नाशिक,३३३ रूपेय रोख, करंडक व प्रशस्तिपत्र) डॉ. प्रकाश शेवाळे, डॉ. डी. पी. पवार, मुख्याध्याक आर. एम. पाटील आदींसह प्राध्यापक वर्ग उपस्थित होता. प्रा. पाटील यांनी परिचयच केला. प्रा. सी. बी. सैंदाणे व प्रा. जी. यू. मोरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. पी. व्ही. देशपांडे यांनी आभार मानले.



पेठ : येथे झालेल्या दादासाहेब बिडकर स्मृती वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांसह प्राचार्य.

# वादविवाद स्पर्धा रंगली ऑनलाइन

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या जनसंज्ञापन विभागातर्फे डॉ. वा. ना बेडेकर आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. करोनाचे सावट असल्याने ही स्पर्धा ऑनलाइन स्वरूपात घेण्यात आली. मुंबई, पुणे, सोलापूर, औरंगाबाद, मिरज, कोल्हापूर, रत्नागिरी अशा विविध भागांतून अनेक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

'भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी टप्प्यात प्रसारमाध्यमे जबाबदार आहेत का?' हा स्पर्धेचा विषय होता. विद्यार्थ्यांनी या विषयावरील आपली मते चांगल्या प्रकारे मांडली. स्पर्धेमध्ये माध्यमांचे महत्त्व तसेच त्रुटी याविषयी चर्चा झाली. स्पर्धेला परीक्षक म्हणून ज्येष्ठ पत्रकार व



साहित्यिक विनोद पितळे तसेच ज्येष्ठ पत्रकार संदीप प्रधान होते. वादविवाद स्पर्धेचे प्रथम पारितोषिक बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी येथील आदित्य मोरे आणि समृद्धी राऊत यांनी पटकावले. तर द्वितीय पारितोषिक रुईया कॉलेजमधील श्रेया जोशी आणि आदित्य देशमुख यांना मिळाले. तृतीय पारितोषिकाचे मानकरी वि. ग. वझे केळकर महाविद्यालयामधील पार्थ डोंगरे आणि विशाखा ढोपे ठरले. तसेच 'विशेष उल्लेखनीय' पुरस्कार सोलापूर येथील पीएएच विद्यापीठामधील सौरभ वाघमारे आणि कोल्हापूरच्या भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमधून संकेत पाटील याने पटकावला. जोशी-बेडेकर [illegible] सुचित्रा नाईक, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभागाचे उपप्राचार्य डॉ. महेश पाटील यांनी विशेष मार्गदर्शन केले.

---

www.ehitavada.com ■ Published simultaneously from NAGPUR, RAIPUR, JABALPUR, BHOPAL ● THURSDAY ● SEPTEMBER 8 ● 2022 18 Pages ● Rs 5.00 ● Final Edit

75 Azadi Ka Amrit Mahotsav

NAGPUR

The Hitavada

THE PEOPLE'S PAPER SINCE 1911

SPIRIT OF INDEPENDENCE

# Kolhapur's Sanket wins Dr Ingle Elocution trophy



The winners of the competition along with dignitaries.

**■ District Correspondent**

AKOLA, Sept 7

BRILLIANT orator Sanket Patil from Kolhapur won first prize in the State-level Open Grand Oratory Competition organised jointly by Sarthak Waktrutva Academy and Samyak Sambodhi Sanstha, Akola, the other day. He was also presented Prof Dr M R Ingle Elocution Trophy 2022.

The competition was organised to celebrate the 63rd birthday of noted thinker and speaker Prof Dr M R Ingle at Samyak Sambodhi auditorium. The competition was organised to encourage thoughtful and pragmatic outlook among youths. Youth from different parts of Maharashtra participated in the competition.

Sanket Patil (Kolhapur) won the first prize, Yash Patil (Mumbai) won second prize while Akshay Ilke (Ichalkaranji) won the third prize. Mandar Latpatte (Parbhani), Saransh Sonar (Kolhapur), Vaishnavi Atkare (Nagpur), Pawanlal Hukre (Bhandara), and Vishal Charchwal (Nagpur) were presented consolation prizes.

Dr Rajesh Deshmukh, Sanjay Kamal Ashok, Chandrakant Zatale worked as judges of the competition. Resident Deputy Collector Prof Sanjay Khadse presided over the prize distribution ceremony. Dr Sandeep Bhowate, Prof Dr M R Ingle, Sangeeta Ingle, Dr B S Ingle graced the occasion.

Youth should collectively think over the problems in the society to find lasting solutions. The present elocution competition served to give impetus to the thought process of youth, asserted RDC Prof Sanjay Khadse. Vaishnavi Hagone conducted the programme while Vishal Nandagawli proposed a vote of thanks. Dr Manohar Wasnik, Prof Rahul Mahure, Prof Akash Haral, Vishal Ingle, Amit Londhe, Aditya Bavangade, Nagsen Ambhore, Abhay Tayde and others took efforts for the success of the programme.

**दिव्य मराठी विशेष** • सार्थक वक्तृत्व अकॅडमी, सम्यक संबोधी संस्थेचा संयुक्त उपक्रम

# वक्तृत्व स्पर्धा; कोल्हापूरच्या संकेतने पटकावला पहिला क्रमांक

**प्रतिनिधी** | अकोला



'प्रोफेसर डॉ. एम.आर. इंगळे वक्तृत्व करंडक २०२२' स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांसह मान्यवर.

सार्थक वक्तृत्व अकॅडमी व सम्यक संबोधी संस्थेच्या संयुक्त सहकार्याने आयोजित राज्यस्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेत कोल्हापूरच्या संकेत पाटील याने प्रथम पारितोषिक पटकावून 'प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे वक्तृत्व करंडक २०२२' हा बहुमान प्राप्त केला. देशातील सध्याची परिस्थिती पाहता संवेदनशील समाज निर्माण होण्यासाठी विचारशील आणि कृतीशील पिढी तयार व्हावी, या प्रामाणिक हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून तरुणांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत प्रथम क्रमांक संकेत पाटील (कोल्हापूर), द्वितीय क्रमांक यश पाटील(मुंबई), तृतीय क्रमांक अक्षय इळके (इचलकरंजी) यांनी पटकावला तर प्रोत्साहनपर पारितोषिक मंदार लटपटे ( परभणी), सारांश सोनार (कोल्हापूर), वैष्णवी अतकरे (नागपूर), पवनलाल हुकरे ( भंडारा), विशाल खर्चवाल ( नागपूर) यांनी पटकावली. वक्तृत्व स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. राजेश देशमुख, संजय कमल अशोक, चंद्रकांत झटाले होते. बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी प्रा. संजय खडसे हे होते. तर विचारमंचावर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. संदीप भोवते, प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे, संगीता इंगळे, डॉ. बी. एस. इंगळे उपस्थित होते. डॉ. एम. आर. इंगळे यांनी ही स्पर्धा निरंतर सुरू राहील आणि महाराष्ट्रात मानाचे स्थान प्राप्त करेल, असे सांगून स्पर्धेला वाढता प्रतिसाद बघता अजून स्पर्धेला सर्वदूर पर्यंत पोहोचवण्याचे काम करु, असे प्रतिपादन केले.

देशातील समस्यांवर चिंतन करण्यासाठी महाराष्ट्रातील तरुण एकत्रित आले हेचं तरुण जागृत आहेत, याचे लक्षण आहे. विचारांचा जागर घालणारी ही स्पर्धा आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी हागोणे हिने केले तर आभार विशाल नंदागवळी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मनोहर वासनिक, प्रा. राहुल माहुरे, प्रा. आकाश हराळ, विशाल इंगळे, अमित लोंढे, आदीत्य बावनगडे, नागसेन अंभोरे, अभय तायडे, भरत चांदवडकर, सागर तायडे, रोहन काळे, अमित वाहूरवाघ, शशिकांत इंगळे, नागेश वाहुरवाघ, सागर वारके, यश तिवारी, चेतन डोंगरे यांनी परिश्रम घेतले.

**मातृभूमि**

# डॉ. एम. आर. इंगळे वक्तृत्व करंडक स्पर्धेत कोल्हापूरचा संकेत पाटील ठरला मानकरी

। अकोला, दि. ७ ।



सार्थक वक्तृत्व अकॅडमी व सम्यक संबोधी संस्थेच्या संयुक्त सहकार्याने आयोजित राज्यस्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेत कोल्हापूरच्या संकेत पाटील याने प्रथम पारितोषिक पटकावून ' डॉ. एम. आर. इंगळे वक्तृत्व करंडक २०२२' हा बहुमान प्राप्त केला.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून तरुणांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत प्रथम क्रमांक संकेत पाटील (कोल्हापूर), द्वितीय क्रमांक यश पाटील (मुंबई), तृतीय क्रमांक अक्षय इळके (इचलकरंजी) यांनी पटकावला तर प्रोत्साहनपर पारितोषिक मंदार लटपटे (परभणी), सारांश सोनार (कोल्हापूर), वैष्णवी अतकरे (नागपूर), पवनलाल हुकरे (भंडारा), विशाल खर्चवाल ( नागपूर) यांनी पटकावली. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. राजेश देशमुख, संजय कमल अशोक, चंद्रकांत झटाले होते. बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी प्रा. संजय खडसे हे होते. तर विचारमंचावर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. संदीप भोवते, प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे, संगीता इंगळे, डॉ. बी. एस. इंगळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी हागोणे हिने तर आभार विशाल नंदागवळी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मनोहर वासनिक, प्रा. राहुल माहुरे, प्रा. आकाश हराळ, विशाल इंगळे, अमित लोंढे, आदित्य बावनगडे, नागसेन अंभोरे, अभय तायडे, भरत चांदवडकर, सागर तायडे, रोहन काळे, अमित वाहुरवाघ, शशिकांत इंगळे, नागेश वाहुरवाघ, सागर वारके, यश तिवारी व चेतन डोंगरे यांनी परिश्रम घेतले.

Akola city Edition
Sep 8, 2022 Page No. 1
epaper.dailymatrubhumi.com

अजिंक्य भारत

अकोला, बुधवार, दि. ७ सप्टेंबर २०२२

## प्रा. संजय खडसे यांचे प्रतिपादन, कोल्हापूरचा संकेत पाटील ठरला करंडकाचा मानकरी

# विचारांचा जागर घालणारी स्पर्धा होणे गरजेचे !

अकोला, दि. ६ प्रतिनिधी :

**देशातील समस्यांवर चिंतन करण्यासाठी महाराष्ट्रातील तरुण एकत्रित आले. हेच तरुण जागृत आहेत याचे लक्षण आहे. विचारांचा जागर घालणारी ही स्पर्धा आहे. डॉ.एम.आर. इंगळे यांचा वाढदिवस वैचारिक पध्दतीने साजरा होतो याचा सार्थ अभिमान वाटतो. असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष निवासी उपजिल्हाधिकारी प्रा. संजय खडसे यांनी केले.**




देशातील सद्याची परिस्थिती पाहता संवेदनशील समाज निर्माण होण्यासाठी विचारशील आणि कृतीशील पिढी तयार व्हावी या प्रामाणिक हेतूने सार्थक वक्तृत्व अकॅडमी व सम्यक संबोधी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने प्रोफेसर डॉ. एम.आर.इंगळे वक्तृत्व करंडक 2022 राज्यस्तरीय खुली भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी ते स्पर्धेच्या बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्रा. संजय खडसे निवासी उपजिल्हाधिकारी हे होते.

तर विचारमंचावर प्रमुख उपस्थिती डॉ. संदीप भोवते, प्रोफेसर डॉ.एम आर इंगळे, संगीता इंगळे, डॉ. बि. एस. इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत राज्यभरातून सहभागी झालेल्या स्पर्धकातुन कोल्हापूरच्या संकेत पाटील यांनी प्रथम पारितोषिक पटकावून प्रोफेसर डॉ. एम.आर इंगळे वकृत्व करंडक स्पर्धेचे जेतेपद पटकावले.

या वक्तृत्व स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. राजेश देशमुख, संजय कमल अशोक, चंद्रकांत झटाले यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी हागोणे तर आभार प्रदर्शन विशाल नंदागवळी यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ मनोहर वासनिक, प्रा.राहुल माहुरे, प्रा.आकाश हराळ, विशाल इंगळे, अमित लोंढे, आदीत्य बावनगडे, नागसेन अंभोरे, अभय तायडे, भरत चांदवडकर, सागर तायडे, रोहन काळे, अमित वाहूरवाघ, शशिकांत इंगळे, नागेश वाहुरवाघ, सागर वारके, यश तिवारी, चेतन डोंगरे यांनी पुढाकार घेतला.

दैनिक जनमाध्यम

अकोला–वाशिम–बुलढाणा

एक प्रतिष्ठित सवय

# कोल्हापुरचा संकेत पाटील ठरला मानकरी

## • प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे वक्तृत्व करंडक २०२२ •

■ प्रतिनिधी । अकोला ■

सार्थक वक्तृत्व अकॅडमी व सम्यक संबोधी संस्थेच्या संयुक्त सहकार्याने आयोजित राज्यस्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धेत कोल्हापूरच्या संकेत पाटील याने प्रथम पारितोषिक पटकावून 'प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे वक्तृत्व करंडक २०२२' हा बहुमान प्राप्त केला.

देशातील सद्याची परिस्थिती पाहता संवेदनशील समाज निर्माण होण्यासाठी विचारशील आणि कृतीशील पिढी तयार व्हावी, या प्रामाणिक हेतूने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून तरुणांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत प्रथम क्रमांक संकेत पाटील (कोल्हापूर), द्वितीय क्रमांक यश पाटील (मुंबई), तृतीय क्रमांक अक्षय इळके (इचलकरंजी) यांनी पटकावला तर प्रोत्साहनपर पारितोषिक मंदार लटपटे (परभणी), सारांश सोनार (कोल्हापूर), वैष्णवी अतकरे (नागपूर), पवनलाल हुकरे (भंडारा), विशाल खर्चवाल (नागपूर) यांनी पटकावली. वक्तृत्व स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. राजेश देशमुख, संजय कमल अशोक, चंद्रकांत झटाले होते. बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी प्रा. संजय खडसे हे होते. तर विचारमंचावर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. संदीप भोवते, प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे, संगीता इंगळे, डॉ. बी. एस. इंगळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी हागोणे हिने तर आभार विशाल नंदागवळी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मनोहर वासनिक, प्रा. राहुल माहुरे, प्रा. आकाश हराळ, विशाल इंगळे, अमित लोंढे, आदीत्य बावनगडे, नागसेन अंभोरे, अभय तायडे, भरत चांदवडकर, सागर तायडे, रोहन काळे, अमित वाहूरवाघ, शशिकांत इंगळे, नागेश वाहुरवाघ, सागर वारके, यश तिवारी, चेतन डोंगरे यांनी परिश्रम घेतले.




> देशातील समस्यांवर चिंतन करण्यासाठी महाराष्ट्रातील तरुण एकत्रित आले हेचं तरुण जागृत आहेत, याचे लक्षण आहे. विचारांचा जागर घालणारी ही स्पर्धा आहे. त्यामुळे ती निरंतर सुरू राहील आणि महाराष्ट्रात मानाचे स्थान प्राप्त करेल, असे सांगून स्पर्धेला वाढता प्रतिसाद बघता अजून स्पर्धेला सर्वदूर पर्यंत पोहोचवण्याचे काम करण्यासाठी प्रयत्नरत आहे.
>
> **- प्रा.डॉ. एम.आर. इंगळे**

दैनिक

# अधिकारनामा

विदर्भातील सर्वाधिक पसंतीचे दैनिक

## प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे वक्तृत्व करंडक २०२२

## स्पर्धेचा मानकरी ठरला कोल्हापूरचा संकेत पाटील



**अविनाश पोहरे**

**अकोला :** दि ४ सप्टेंबर २०२२ सार्थक वक्तृत्व अकॅडमी व सम्यक संबोधी संस्था अकोला यांच्या संयुक्त विद्ययमाने आयोजित राज्यस्तरीय खुली भव्य वक्तृत्व स्पर्धेत कोल्हापुरच्या संकेत पाटील याने प्रथम पारितोषिक पटकावून 'प्रोफेसर डॉ. एम. आर.इंगळे वक्तृत्व करंडक २०२२' हा बहुमान प्राप्त केला.फुले, शाहु, आंबेडकरी विचारवंत व सुप्रसिध्द वक्ते मा. प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त दि.०४ सप्टेंबर २०२२ रोजी सम्यक संबोधी सभागृह,रणपिसे नगर,अकोला येथे राज्यस्तरीय खुली भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते.देशातील सद्र्याची परिस्थिती पाहता संवेदनशील समाज निर्माण होण्यासाठी विचारशील आणि कृतीशील पिढी तयार व्हावी या प्रामाणिक हेतूने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत महाराष्ट्रातील काणा-कोपऱ्यातुन तरुणांनी सहभाग नोंदविला होता. त्याकरिता बक्षिसे म्हणून प्रथम ७०००/-,द्वितीय ५०००/-,तृतीय ३०००/-, प्रोत्साहनपर पाच पारितोषिक प्रत्येकी १०००/- रोख,ट्रॉफी, प्रमाणपत्र व संविधान असे बक्षिसाचे स्वरूप होते. एकून २०,०००₹ ची बक्षीसे होती.या स्पर्धेत प्रथम संकेत पाटील (कोल्हापूर),द्वितीय यश पाटील (मुंबई),तृतीय अक्षय इळके (इचलकरंजी) प्रोत्साहन १) मंदार लटपटे ( परभणी) २) सारांश सोनार (कोल्हापूर) ३) वैष्णवी अतकरे (नागपूर) ४) पवनलाल हुकरे ( भंडारा) ५) विशाल खर्चवाल ( नागपूर) यांनी पारितोषिके पटकाविली. वक्तृत्व स्पर्धेचे परिक्षक म्हणुन डॉ. राजेश देशमुख,संजय कमल अशोक,चंद्रकांत झटाले यांनी जबाबदारी पार पाडली.बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.संजय खडसे निवासी उपजिल्हाधिकारी, अकोला हे होते.तर विचारमंचावर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. संदीप भोवते, प्रोफेसर डॉ. एम. आर. इंगळे, सौ. संगीता इंगळे, डॉ. बि. एस. इंगळे,आदी मान्यवर उपस्थित होते.डॉ. एम. आर. इंगळे यांनी ही स्पर्धा निरंतर सुरू राहील आणि महाराष्ट्रात मानाचे स्थान प्राप्त करेल असे सांगुन स्पर्धेला वाढता प्रतिसाद बघतां अजुन स्पर्धेला सर्वदूर पर्यंत पोहचविण्याचे काम करु असे प्रतिपादन केले.देशातील समस्यांवर चिंतन करण्यासाठी महाराष्ट्रातील तरुण एकत्रित आले हेचं तरुण जागृत आहेत याचे लक्षण आहे. विचारांचा जागर घालणारी ही स्पर्धा आहे. डॉ.एम.आर. इंगळे यांचा वाढदिवस वैचारिक पध्दतीने साजरा होतो याचा सार्थ अभिमान वाटतो.असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. संजय खडसे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी हागोणे तर आभार प्रदर्शन विशाल नंदागवळी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ मनोहर वासनिक, प्रा.राहुल माहुरे,प्रा.आकाश हराळ,विशाल इंगळे,अमित लोंढे,आदीत्य बावनगडे,नागसेन अंभोरे, अभय तायडे, भरत चांदवडकर,,सागर तायडे,रोहन काळे, अमित वाहूरवाघ, शशिकांत इंगळे,नागेश वाहुरवाघ सागर वारके, यश तिवारी, चेतन डोंगरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

Vijay Ram Ghorpade
Digitally signed by Vijay Ram Ghorpade
Date: 2023.04.18 09:50:04 +05'30'